# महाराष्ट्र विधानसभा
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## गुरुवार, दिनांक १४ मार्च, २०१३
## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : विशेषाधिकार भंगाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स.नियम २७३ अन्वये).**

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**चार : औचित्याचे मुद्दे - (असल्यास)**

**पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

(१) **श्री. आर.एम.वाणी**, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयातील (घाटी रुग्णालय) एन.आय.सी.यु. विभागातील कोट्यवधी रूपयांची उपकरणे तीन वर्षांपासून पडून असल्याचे प्रकरण दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३ रोजीच्या सुमारास उघडकीस येणे, मराठवाड्यासह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या गोर-गरीब रूग्णांना घाटीत उपचार करण्यात येणे, एन.आय.सी.यु., ट्रॉमा केअर नेफ्रॉलॉजी हे विभाग सुरू होऊ शकलेले नसणे, सन २००९ मध्ये सदर विभागाचे लोकार्पण होणे, लार्सन ॲण्ड टुब्रो कंपनीकडून खरेदी करण्यात आलेल्या व्हेंटीलेटर, इन्क्युबेटर, वार्मरसह इतर उपकरणांची एक वर्षाची वॉरंटी न वापरता संपणे, घाटी प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे कोट्यवधीची उपकरणे हाताशी असूनदेखील हजारो नवजात शिशुंना घाटीत उपचार मिळू शकलेले नसणे, नवजात शिशु विभागातील विद्युत यंत्रणाही वापरण्यायोग्य नसणे, जन्मतःच प्रकृतीत बिघाड असलेल्या नवजात बालकांचा व्हेंटीलेटर, वार्मरअभावी मृत्यू होणे, रूग्णांना खाजगी महागडया वैद्यकीय सेवेचा भुर्दंड सहन करावा लागणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी नवजात शिशुंना घाटीत उपचार मिळत नसल्याने त्यांच्या पालकांमध्ये व नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री विजयकुमार देशमुख,** नाना पटोले, अनिल बावनकर, डॉ. नामदेव उसेंडी, श्री विजय वडेट्टीवार, ॲड.यशोमती ठाकूर, सर्वश्री विनायक निम्हण, अब्दुल सत्तार, रावसाहेब अंतापूरकर, सुधाकर देशमुख, देवेंद्र फडणवीस, विकास कुंभारे, कृष्णा खोपडे, संभाजी पवार, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृह मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्यातून लहान मुले बेपत्ता होण्याच्या घटनांमध्ये गेल्या काही वर्षात वाढ होत असणे, सन २०११ मध्ये महाराष्ट्रातून तब्बल १५ हजार २७५ बालके हरवल्याच्या तक्रारी नोंद झाल्याची माहिती राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने माहितीच्या अधिकारामध्ये दिली असणे, सन २०११ या वर्षात ६ हजार २९२ मुले आणि ८ हजार ९६२ मुली हरवल्याच्या तक्रारी राज्याच्या ३३ जिल्ह्यांमध्ये विविध पोलीस स्टेशनमध्ये नोंद झालेल्या असणे, त्यातील १२ हजार ४४६ बालकांना शोधण्यात पोलिस यंत्रणेला यश आले असून २ हजार ८२९ बालके अद्याप सापडलेली नसणे, बालके हरविण्याच्या सर्वाधिक घटना मुंबईत घडल्या असणे, वर्षभरात या शहरातून ३ हजार ५८३ बालके गायब झाली असणे, राज्यात इतरत्र अहमदनगर जिल्ह्यात सर्वाधिक म्हणजे ५२५ बालके हरवली असणे, त्यापाठोपाठ ठाणे, पुणे, नाशिक, नांदेड, परभणी आणि यवतमाळ या जिल्ह्यातून बालके हरवल्याच्या सर्वाधिक तक्रारी प्राप्त झालेल्या असणे, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी सर्वसामान्य जनतेमध्ये भीतीचे व असंतोषाचे वातावरण निर्माण होणे, यावर शासनाने केलेली तातडीची कार्यवाही व उपाययोजना".

(३) **श्री. गिरीश बापट,** श्रीमती माधुरी मिसाळ, डॉ. सुधाकर भालेराव, डॉ. खुशाल बोपचे, सर्वश्री विरेंद्र जगताप, विजय वडेट्टीवार, राजकुमार बडोले, संभाजी पवार, डॉ.संजय कुटे, वि.स.स पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"गेल्या पाच वर्षापासून राज्यातील शासकीय मागासवर्गीय विद्यार्थी वसतीगृहांची निर्मिती न झाल्याने साडेपाच हजार विद्यार्थी लाभापासून वंचित राहिलेले असणे, त्यामुळे त्यावर अवलंबून असलेल्या शेकडो हातांना कामही न मिळणे, खेड्यापाड्यात, दुर्गम भागात राहणाऱ्या आणि शिक्षणाची तळमळ असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह, शिक्षण शुल्कात आणि इतर शैक्षणिक सुविधांमध्ये सूट मिळाल्यास उच्च शिक्षण घेणे शक्य होणे, मागासवर्गीय मुला-मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून त्यांच्यासाठी वसतीगृह सुरू करण्याचा शासनाने निर्णय घेणे, मुलांसाठी ६० आणि मुलींसाठी ४० अशी एकूण १०० नवीन शासकीय वसतीगृहे अभिप्रेत असणे, प्रत्येक वसतीगृहात १०० मुलांची

संख्या मान्य करण्यात येणे, सोबतच मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर आणि लातूर या सात विभागीय मुख्यालयांच्या ठिकाणी एक अशी सात वसतीगृहे सुरू करण्यास राज्य शासनाने मान्यता देणे, जून २००७ पासून अद्यापही नागपुरात अशा प्रकारच्या वसतीगृहांच्या निर्मितीसाठी जागादेखील मिळवण्याची कार्यवाही संबंधित विभागाने केलेली नसणे, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने या प्रकरणी तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

**( दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत - मध्यंतर )**

**सहा : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (पहिला दिवस).**

**सात : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :- गत सत्रातील प्रलंबित (सूचना क्र. १)**

(१) **श्री.नानाजी शामकुळे, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"चंद्रपूर जिल्ह्यातील वाढत्या औद्योगिकरणामुळे चंद्रपूर जिल्हा प्रदुषणात देशात चौथ्या क्रमांकावरुन पहिल्या क्रमांकावर आलेला असणे, प्रदुषणामुळे येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले असणे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ठरवून दिलेल्या नियमांचे उद्योजकांकडून उल्लंघन होत असल्यामुळे प्रदुषणात दिवसेंदिवस भर पडत असणे, सांडपाणी व्यवस्थापन होत नसल्यामुळे दूषित पाणी रस्त्यावर येवून लगतच्या शेतात व नाल्यात जात असणे, जड वाहनांकरिता ठरवून दिलेल्या नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्यामुळे ग्रामीण व शहरी भागात प्रदुषणात भर पडत असून रस्ते खराब होत असणे, चंद्रपूर जिल्ह्यातील प्रदुषणाला आळा घालणे अत्यंत गरजेचे असणे, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना."

**(मंगळवार, दिनांक १२ मार्च, २०१३ रोजीच्या बॅलटद्वारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना) (सूचना क्र.२ व ३)**

(२) **श्री. विजयबाबू घोडमारे, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"नागपूर शहरातील सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल ट्रान्सप्लांट युनिट ३ वर्षापासून बंद असल्याचे नुकतेच उघडकीस येणे, किडणी स्टोनच्या उपचारासाठी असलेले लिथोट्रिप्सी मशिन तंत्रज्ञाअभावी बंद असणे, मेयो आधुनिकीकरणाची प्रक्रिया मागील अनेक वर्षापासून

प्रलंबित असणे, या वर्षी मेयोचा अपेक्षित विकास न झाल्याने एम.बी.बी.एस.च्या ४० जागा कायम रद्द होण्याचा संभाव्य धोका टाळण्यासाठी विकास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत मेयो प्रशासनाने वैद्यकीय संचालनालयाकडे पत्र देणे, मेडीकल प्रशासन कॅन्सरग्रस्तांच्या बाबतीत उदासीन असल्याने प्रतिक्षा यादी मोठ्या प्रमाणात वाढणे, रेडिओथेरपी तंत्रज्ञांची कमतरता असणे, राज्यात नागपूर येथील एम.डी. रेडिओथेरपी हा पदव्युत्तर अभ्यासक्रम असणे, या अभ्यासक्रमाकरिता यंत्र सामुग्रीची पूर्तता केलेली नसणे, संस्थेतील कोबाल्ट यंत्रही जुने झाल्याने क्षमता ५०% पेक्षा कमी झाली असणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना."

(३) **श्री. कृष्णा खोपडे, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"भटक्या व विमुक्त (धनगर) समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी गठीत रेणके आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात विलंब होणे, राज्यात धनगर समाजाची लोकसंख्या सुमारे दीड करोड असून ९०% लोकांकडे हक्काची जमीन नसणे, धनगर समाजाला विकासाअभावी शासकीय योजनांचा फायदा मिळू न शकणे, तसेच कायदेशीर व्यवसाय नसल्याने समाज गुन्हेगारीच्या चक्रात फसणे, धनगर समाज सर्वात गरीब, निरक्षर आणि वंचित घटक असून ९८% लोक बेघर व भूमिहीन असणे, त्यामुळे धनगर समाजाच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीमध्ये अडथळा निर्माण होणे, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना"

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १३ मार्च, २०१३.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.